सायं. दैनिक
केज
# जननेता
सर्व सामान्य जनतेचे हक्काचे वृत्तपत्र...!



मारोती इंगळे व ओमकार कोरे या विद्यार्थ्यांनी सायबर शिक्षा आणि सायबर सुरक्षा या विषयावर केले सखोल मार्गदर्शन!

## स्वामी विवेकानंद विद्यालयात सायबर सुरक्षा शिबीर संपन्न

चाकूर प्रतिनिधी/ स्वामी विवेकानंद विद्यालय चापोली येथे दि. 14 ऑगस्ट 2024 रोजी शाहू महाविद्यालय लातूर येथिल बी. एस्सी. सी.एस मधे शिकत आसलेल्या मारोती इंगळे व ओमकार कोरे या विद्यार्थ्यांनी सायबर शिक्षा आणि सायबर सुरक्षा या विषयावर ५वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले.सध्याचा काळात सायबर गुन्हें हे वाढत आहेत.आशा गुन्हयापासुन प्रत्येकाने सावध असले पाहिजे इंटरनेटचा योग्य वापर, मोबाईला दिले जाणारे परमिशन्स अनोळखी व्यक्तीना माहिती शेअर करणे,चुकीच्या वेबसाईट लिंक ला क्लिक करने यापासून दूर राहिले पाहिजे.साइबर शिक्षा साइबर सुरक्षा हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे व राजर्षी शाहू महाविदयालय यांच्या संयुक्त विद्यमाने मागील दोन वर्षापासून लातूर जिल्यात राबविला जात आहे.या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे व्ही.यन. व इतर शिक्षक वर्गउपस्थित होते.